मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

२५ वर्षे विश्वासार्हतेची

७८

RNI Regd No.72105/99 * वर्ष २६ * अंक ३१५ सातारा * गुरूवार दि.१५ ऑगस्ट २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

दैनिक राजदंडच्या असंख्य वाचकांना ७८ व्या स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

# विनेश फोगटला रौप्य पदक नाहीच

## क्रीडा लवादानं फेटाळले अपील



**मुंबई** : भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगटला पॅरिस ऑलिम्पिकच्या महिला फ्रीस्टाइल कुस्ती प्रकारातील ५० किलो वजनी गटाच्या अंतिम फेरीपूर्वी अपात्र ठरवण्यात आले होते. विशेनचं वजन १०० ग्रॅम जास्त असल्याने हा ऑलिम्पिक प्रशासनाकडून हा निर्णय घेण्यात आला होता. यानिर्णयानंतर आपल्याला रौप्य पदक मिळावं, अशी मागणी करणारी याचिका विनेशने क्रीडा लवादाकडे केली होती. दरम्यान, क्रीडा लवादाने ही याचिका फेटाळून लावली आहे. भारतासाठी हा मोठा धक्का मानला जातो आहे.

इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, क्रीडा लवादाचे अध्यक्ष डॉ. नाबेले बेनेट यांनी विनेशची रौप्य पदक देण्याची मागणी करणारी याचिका फेटाळली आहे. भारतीय कुस्तीपटू विनेश फोगटने ७ ऑगस्ट रोजी केलेली याचिका फेटाळण्यात आली असून यासंदर्भात सविस्तर आदेश लवकरच जारी करण्यात येईल, असं क्रीडा लावादाने म्हटलं आहे.

**पीटी उषा यांनीही दिली प्रतिक्रिया**

दरम्यान, क्रीडा लवादाच्या या निर्णयानंतर भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा पीटी उषा यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. हा निर्णय धक्कादायक आणि निराशाजनक असल्याचे त्यांनी म्हटलं आहे.

**विनेश फोगटच्या वकिलांनी नेमका काय युक्तिवाद केला होता?**

विनेश फोगटच्या वकिलांनी कुस्ती स्पर्धेचे ठिकाण चॅम्प डी मार्स एरिना आणि ऑलिम्पिक क्रीडा नगरी यातील अंतर तिचे वजन कमी न होण्यामागचे कारण असल्याचे त्यांनी सांगितले होतं. अंतिम सामन्यापूर्वी वजन चाचणी करण्याची एक निश्चित वेळ असते, या वेळेत खेळाडूंनी कुस्ती स्पर्धा होणाऱ्या ठिकाणी हजर राहणे आवश्यक आहे. ऑलिम्पिक क्रीडा नगरीपासून कुस्ती स्पर्धेचे ठिकाण चॅम्प डी मार्स एरिना यात १९ किलोमीटर इतके अंतर आहे, ज्यामुळे कारने चॅम्प डी मार्स एरिनाला पोहोचायला अर्धा तासाहून अधिक वेळ लागतो, तर मार्गावर ट्रॅफिकही असते, या अंतरामुळे तिला वजन कमी करण्यास फार वेळ मिळाला नसल्याचेही त्यांनी सांगितले. याबरोबरच विनेशच्या सामन्यांचे वेळापत्रक (पहिल्या दिवशी झालेले तीन सामने) फारच व्यग्र असल्याने तिला वजन कमी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. त्यामुळे तिचे वजन ५२ किलोपेक्षा जास्त झाले असा युक्तिवादही त्यांनी केला होता. १०० ग्रॅम जास्त वजन हे अत्यंत नगण्य आहे आणि उन्हाळ्याच्या हवामानात मानवी शरीरात सूज येण्यामुळे सहज वजन वाढू शकते, कारण उष्णतेमुळे मानवी शरीर अधिक पाणी टिकवून ठेवते, म्हणजेच वैज्ञानिकदृष्ट्या उष्ण वातावरणात टिकून राहण्यासाठी मदत करण्यासाठी शरीर हे कार्य करते. स्नायूंचे वस्तूमान वाढल्यामुळे देखील वजन वाढू शकते कारण खेळाडूने एकाच दिवशी तीन सामने खेळले होते. प्रत्येक सामन्यानंतर पुढील सामन्यात चांगली कामगिरी करण्यासाठी तिचे शरीर तितकेच मजबूत राहण्यासाठी आवश्यक आहार घेतल्यानेही तिचे वजन वाढू शकते, असेही त्यांनी म्हटलं होतं.

### नेमकं प्रकरण काय?

**पॅरिस ऑलिम्पिकदरम्यान विनेश फोगटने सलग ३ सामने जिंकून ५० किलो फ्रीस्टाइल कुस्तीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला होता. अंतिम सामना हा ७ ऑगस्टच्या रात्री होणार होता, पण त्याच दिवशी सकाळी वजन वाढल्यामुळे विनेशला अपात्र ठरवण्यात आले होतं. यानंतर विनेशने क्रीडा लवादाकडे याचिका दाखल केली होती. आपल्याला सुवर्णपदकाचा सामना खेळण्याची परवानगी द्यावी, ही तिची पहिली मागणी होती. मात्र नियमांचा हवाला देत तिची मागणी तात्काळ फेटाळण्यात आली होती.**

**ही मागणी फेटाळल्यानंतर विनेशने तिला या रौप्यपदक मिळावे, अशी मागणी केली होती. यावर क्रीडा लवादाकडून १० ऑगस्ट रोजी निर्णय येणार होता. मात्र, तो ११ ऑगस्टवर ढकण्यात आला. यानंतर हा निर्णय १३ ऑगस्ट रोजी सुनावण्यात येईल, असं सांगण्यात आलं. त्यानंतर परत हा निर्णय १६ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात येणार असल्याचं सांगण्यात आलं. मात्र, क्रीडा लवादाने आज त्यापूर्वीच निर्णय दिला.**

# सिन्नर 'एमआयडीसी'तील समस्यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला सविस्तर आढावा

**मुंबई** : नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर तालुक्यातील 'इंडिया बुल्स' प्रकल्पाकरिता संपादित जमिनीच्या व्यतिरिक्त शेतकऱ्यांच्या वैयक्तिक मालकीच्या जमिनीच्या सातबाऱ्यांवरील कर्जाचे बोजे दि.३१ ऑगस्टपर्यंत हटवून त्याबाबतचा अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्यांना आज दिले. त्याचबरोबर सिन्नर 'एमआयडीसी'तील उद्योजकांना भेडसावणारे प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक वसाहतीच्या विविध समस्या सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस उद्योगमंत्री उदय सामंत (व्हिसीद्वारे), आमदार माणिकराव कोकाटे, आमदार राजू कारेमोरे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.राजगोपाल देवरा, प्रधान सचिव सौरभ विजय, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.



हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बिपिन शर्मा, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे डॉ. अविनाश ढाकणे, नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा (व्हिसीद्वारे) उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, उद्योगांना चालना देण्यासाठी माळेगाव व मुसळगाव लिंक रोड लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. हा रस्ता सिन्नर शहराच्या पूर्व व पश्चिमेस असलेल्या दोन औद्योगिक वसाहतींसह रतन इंडिया प्रकल्पाला जोडणार आहे. या रस्त्याकरिता नगरपालिकेने जागा संपादित करुन ती 'एमआयडीसी'ला वर्ग करावी. या रस्त्याचे काम 'एमआयडीसी'ने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. सिन्नर तालुक्यातील मुसळगाव औद्योगिक वसाहतीत पाच एकर क्षेत्रात शंभर बेडच्या हॉस्पिटलची उभारणी करण्यासाठी 'ई.एस.आय.सी.'ला तात्काळ जागा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. तसेच 'महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६' या कायद्यात सुधारणा झाल्याने तसेच रेडी रेकनरच्या दरानुसार त्याची आकारणी करण्यात येत असल्याने फायर चार्जेसच्या दरात मोठी वाढ झाली आहे. हे दर उद्योजकांना परवडत नसल्याने फायर चार्जेस दर कमी करण्याबाबतचा प्रस्ताव 'एमआयडीसी'ने शासनाकडे पाठविण्याच्या सूचना त्यांनी केल्या. त्याचप्रमाणे, सिन्नर औद्योगिक क्षेत्रात बहुतांश अभियांत्रिकी व त्यासंलग्न उद्योग कार्यान्वित आहेत.

# विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीवर शिक्षकांनी भर द्यावा : शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर

**मुंबई** : शासनाने राज्यातील उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००३-०४ ते २०१८-१९ या कालावधीत वाढीव पदावर कार्यरत पात्र शिक्षकांचे समायोजन करण्याबाबतचा निर्णय घेतला होता. त्यानुसार वाढीव पदावरील १८ पात्र शिक्षकांच्या समायोजन आदेशाचे वाटप शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले. सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीवर भर द्यावा, असे सांगून श्री.केसरकर यांनी समायोजित शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. मुंबई विभागीय शिक्षण उपसंचालक संदीप संगवे यावेळी उपस्थित होते.

वाढीव पदावर कार्यरत पात्र शिक्षकांचे समायोजन करण्याबाबतच्या शासनाच्या निर्णयानुसार यापूर्वी मुंबई विभागातील २१ शिक्षकांना मंत्री श्री. केसरकर यांच्या हस्ते १० जानेवारी २०२४ रोजी समायोजनाचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर, यापूर्वी समायोजन न झालेल्या पात्र शिक्षकांचे समायोजन करण्याचे आदेश ७ मार्च २०२४ रोजी प्राप्त झाल्यानुसार शिक्षण उपसंचालक कार्यालयाने १६ वाढीव पदावरील कार्यरत शिक्षकांचे समायोजन केले. मात्र काही पात्र शिक्षकांना समायोजनासाठी कनिष्ठ महाविद्यालय उपलब्ध नव्हते, अशा शिक्षकांच्या समायोजनासाठी शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून रिक्त जागांचा आढावा घेऊन पात्र शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत शासनास विनंती केली होती, त्यानुसार दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या चर्नी रोड येथील राज्य प्रकल्प संचालक कार्यालयात आयोजित कार्यक्रमात मंत्री श्री.केसरकर यांच्या हस्ते १८ शिक्षकांना हे वाटप आदेश देण्यात आले.

या कार्यक्रमास संबंधित शिक्षकांसह त्यांचे कुटुंबिय उपस्थित होते. यावेळी सर्व शिक्षकांनी शालेय शिक्षण मंत्री आणि राज्य शासनाविषयी कृतज्ञता व्यक्त केली.



## कोयनेच्या संडव्यावरून पाणी वाहते करून त्यावर

# तिरंगा 'लेसर शो'चे नयनरम्य प्रदर्शन


**कराड** : स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला बुधवारी सायंकाळपासून कोयना धरणाच्या दरवाजांवर देशप्रेम व्यक्त करणारा तिरंगा 'लेसर शो'चे नयनरम्य प्रदर्शन धरण व्यवस्थापनाने साकारले आहे. त्यास समाजमाध्यमांवर सर्वाधिक पसंती मिळत आहे.

देशाच्या १५ ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनानिमित्त कोयना धरण व्यवस्थापनाने धरणाचे सहा वक्र दरवाजे अर्ध्या फुटांवर उचलून धरणातून कोयना नदीपात्रात जलविसर्ग सुरू केला आहे. या एक सलग ओसंडत्या पांढऱ्या शुभ्र पाण्यावर तिरंगा 'लेझर शो'चे नयनरम्य प्रदर्शन घडवले आहे. त्याची छायाचित्रं आणि चलचित्रं समाजमध्यमांवर प्रदर्शित करण्यात आली. त्यास प्रचंड पसंती मिळताना हा तिरंगा लेसर शो समाजमध्यमांवरुन सातासमुद्रापार पोहचला.

कोयना धरणाचा जलसाठा ९०.६३ अब्ज घनफुटांवर (टीएमसी) स्थिर असताना धरणाच्या सांडव्यावरून हा जलविसर्ग करीत एक सलग फेसाळत ओसंडणाऱ्या पाण्यावर दरवर्षीप्रमाणे समाजमध्यामांवर प्रदर्शित केलेला हा 'तिरंगा लेसर शो' लोकांना भुरळ पाडून आहे. अनेकांनी त्याची छायाचित्रं आणि चलचित्रं समाजमध्यमांवर वेगवेगळ्या दर्शनी व विशिष्ट जागेवर (डीपी आणि स्टेटस् ) प्रदर्शित करुन आपले देशप्रेम व्यक्त केले आहे.

# गणेशभक्तांना यंदाही टोलमाफी-मुख्यमंत्री

**मुंबई** : राज्यात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा. गणेशोत्सवापूर्वी राज्यात सर्वत्र गणपती आगमन आणि विसर्जन मार्गावरील खड्डे तातडीने बुजवावेत. त्यासाठी रॅपीड क्वीक सेटिंग हार्डनर-एम सिक्टी या आधुनिक साहित्याचा वापर करावा. झाडांच्या फांद्याची छाटणी करावी. कृत्रिम तलावांची संख्या वाढवावी. मोठ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी आरोग्य पथक, रुग्णवाहिका, अग्निशमन वाहन तैनात करावेत असे निर्देश देऊन गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या गणेशभक्तांना यंदाही टोल माफीचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे जाहीर केला.



सह्याद्री अतिथीगृह येथे गणेशोत्सवानिमित्त कायदा व सुव्यवस्थेचा आढावा आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याबाबत बैठक झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसकर, मुंबई उपनगर पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, उर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त विवेक फणसळकर, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे आदी यावेळी उपस्थित होते. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलिस आयुक्त, जिल्हा पोलिस प्रमुख यावेळी दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले, राज्यात गणेशोत्सवाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आवश्यक त्या तातडीच्या कामांना प्राधान्य दिले पाहिजे. गेल्या वर्षी ज्या सार्वजनिक गणेश मंडळांना परवानगी दिली होती ती यावर्षीही कायम राहील त्यासाठी शुल्क आकारणी करू नये. मंडळांना ज्या अन्य परवानग्या लागतात त्यासाठी एक खिडकी योजना राबवावी.

# नाना पटोलेंची महायुतीवर घणाघाती टीका



**अमरावती** : ''मुख्यमंत्री पदापेक्षा महाराष्ट्राचा स्वाभिमान तसंच महत्त्व जपण्यावर आमचं मुख्य लक्ष्य आहे. महाराष्ट्राचा भावी मुख्यमंत्री कोण होणार? हा मुद्दा आमच्यासाठी महत्त्वाचा नाही. महाराष्ट्राच्या निर्मितीत काँग्रेसचे मोठे योगदान आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या मंगल कलशाने याची सुरुवात झाली. राष्ट्रीय तसंच जागतिकस्तरावर महाराष्ट्राला विकासाच्या दृष्टीने पुढे नेण्याचे काम वसंतराव नाईक यांच्यापासून काँग्रेसच्या सर्व मुख्यमंत्र्यांनी केलेय. मात्र, महाराष्ट्राला गुजरातमध्ये तारण ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत,'' असा हल्लाबोल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी महायुती सरकारवर केलाय. ते आज अमरावतीत पत्रकार परिषदेत बोलत होते.

आमदारांमधून होणार मुख्यमंत्री : ''लोकसभा निवडणुकीनंतर भाजपाची संसदीय बैठक न होता थेट राष्ट्रीय लोकशाही आघाडीची बैठक घेऊन पंतप्रधानांचं नाव घोषित करण्यात आलं. भाजपामध्ये लोकशाही नाही, असं भाजपाचे नेते राजीव प्रताप रुडी यांनी बोलताना मला सांगितलं. आम्ही मात्र लोकशाही मार्गाला महत्त्व देणारे आहोत. आमचे आमदार निवडून येतील. त्यामधूनच आमचा मुख्यमंत्री निवडला जाईल. इकडं महाराष्ट्रातदेखील लाडकी बहीण योजनेप्रमाणं लाडकी खुर्ची अभियान राज्य शासनातील तिन्ही पक्ष राबवीत आहेत,'' अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पटोले यांनी केली.

काँग्रेसच्या पाठीशी जनता : ''लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात जनतेनं काँग्रेसला साथ दिली. अगदी तसंच चित्र आता विधानसभा निवडणुकीतदेखील राहील,'' अशी आशा विधानसभेतील विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केली. '

# महायुतीच्या संयुक्त मेळाव्यांना २० ऑगस्टपासून कोल्हापूर येथून प्रारंभ

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचे जोरदार तयारी सुरू केली असून महायुतीच्या संयुक्त मेळाव्यास २० ऑगस्टला कोल्हापूरपासून प्रारंभ होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत हा मेळावा होणार असून संवाद यात्रांनाही सुरुवात होईल. राज्यात महायुतीचे ९ मोठे मेळावे आयोजित करण्यात येणार असून निवडणूक प्रचाराचा धडाका सुरू होणार आहे.

महायुतीने विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने जनतेपर्यंत पोचण्यासाठी शासकीय पातळीवर आणि पक्षपातळीवर मेळाव्यांचे नियोजन केले आहे. 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना', शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना मोफत वीज यासह अनेक योजना व महत्त्वाचे निर्णय सरकारने घेतले आहेत. ते जनतेपर्यंत पोचविण्यासाठी शासकीय पातळीवरही मोठी मोहीम हाती घेण्यात आली असून मंगळवारी जळगाव येथे 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' मेळावा झाला. या धर्तीवर राज्यात प्रत्येक महसुली विभागात एकूण किमान पाच मोठे संयुक्त मेळावे घेण्यात येणार आहेत. त्याचबरोबर पक्षपातळीवरूनही महायुतीचे संयुक्त मेळावे आयोजित करण्यात येणार असून त्यास शिंदे, फडणवीस व पवार उपस्थित राहतील. नागपूर, अमरावती, जळगाव, नाशिक, संभाजीनगर, लातूर, महाड, ठाणे व मुंबईत हे मेळावे होणार आहेत. 'एकजूट महाराष्ट्राच्या अभिमानाची, विकासाची, कल्याणाची' अशी मेळाव्याची संकल्पना (टॅगलाईन) ठरविण्यात आली आहे. कोल्हापूर येथे पहिला संयुक्त मेळावा होणार असून महालक्ष्मीचे दर्शन घेऊन शिंदे, फडणवीस व पवार हे मेळाव्यास येतील.असे महायुतीचे मुख्य समन्वयक आमदार प्रसाद लाड यांनी सांगितले. या मेळाव्यांसाठी केंद्रीय नेते, मंत्री, महायुतीचे खासदार, आमदार यांच्यासह प्रमुख पदाधिकारी या मेळाव्यास उपस्थित राहतील.

# कांदिवलीत ३७ एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल उभे राहणार

**मुंबई :** कांदिवली येथे ३७ एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल उभारण्याबाबतचा प्रकल्प वेगाने मार्गी लावण्याचा निर्णय घेण्यात आला. गेल्या २०-२५ वर्षांपासून रखडलेल्या या राष्ट्रीय क्रीडा प्राधिकरणाच्या प्रकल्पाचे काम मार्गी लावण्याचा मार्ग आजच्या बैठकीनंतर मोकळा झाला आहे. याठिकाणी भविष्यात आशियाई, राष्ट्रीय, राष्ट्रकुल आणि ऑलिम्पिक स्तरावरचे खेळाडू प्रशिक्षित केले जातील अशी माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

मुंबई महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा आणि एमएमआरडीए च्या अधिका-यांसोबत बुधवारी झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये उत्तर मुंबई आणि मुंबईतील रखडलेले विविध प्रकल्प कामे मार्गी लावण्यासंदर्भात तसेच वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत असेही पियूष गोयल यांनी सांगितले . भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, आ. योगेश सागर, आ.मनीषा चौधरी, आ.सुनील राणे, भाजपा प्रदेश प्रवक्ता गणेश खणकर, ओमप्रकाश चौहान आदी उपस्थित होते.

गोयल यांनी सांगितले की उत्तर मुंबई आणि उर्वरित मुंबईमध्ये अर्धवट आणि रखडलेले विविध प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार मिळून युद्धस्तरावर काम करत आहे.बोरिवली येथील बाळासाहेब ठाकरे उद्यान आणि प्रमोद महाजन क्रीडा संकुल यांच्या सर्वांगीण विकासासाठी विस्तृत चर्चा करून त्याबाबत अहवाल लवकरच सादर करून तेथे क्रीडा सुविधा केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खेळाडूंच्या उज्वल भविष्यासाठी असे प्रकल्प महत्वाचे असून ते पूर्ण करण्यासाठी वेगाने कामे सुरू आहे.

कांदिवली येथील कौशल्य विकास केंद्र येत्या दोन महिन्यांत आणि शिंपोली येथील कौशल्य विकास केंद्र येत्या ६-८ महिन्यांत सेवेत रुजू होईल अशी ग्वाही गोयल यांनी दिली.या बहुविद्याशाखीय केंद्रांमुळे पालघरपर्यंतच्या रहिवाशांना लाभ होणार आहे. मुबईकरांची वाहतुकीची समस्या सोडवून जीवन सुखकर करण्यासाठी देखील प्रयत्न सुरू असल्याचे गोयल यांनी सांगितले. आकुर्ली पश्चिम द्रूतगति मार्गावरील अंडरपासचे काम रखडले होते त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या होती. मात्र बैठकीमध्ये एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी ते काम येत्या १५ दिवसांत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. वाहतूक समस्येवर तोडगा काढण्यासाठी टाटा कंपनीला वाहतूक व्यवस्थापन आराखडा बनवण्याची विनंती केली असल्याची माहिती गोयल यांनी दिली. सह पोलीस आयुक्तांशी चर्चा करून वाहतूक कोंडी होणा-या ठिकाणी अतिरिक्त वाहतूक पोलीस तैनात करण्याची विनंती करून एक सर्वसमावेशक योजना तातडीने आखली जाणार आहे. प्रत्येकाला हक्काचे घर देण्याच्या दिशेने रखडलेल्या गृह आणि पुनर्विकास प्रकल्पांबाबतही बैठकीत चर्चा झाली. प्रत्येक प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ( एसआरए) नोडल एजन्सी म्हणून नियंत्रण ठेवून कामे पूर्ण करून घेणार असल्याची माहितीही गोयल यांनी दिली. पंतप्रधान मोदी यांच्या संकल्पनेतील 'एक पेड मां के नाम' या योजनेनुसार उत्तर मुंबईमध्ये मुंबई महानगर पालिकेतर्फे एक लाख वृक्षांची लागवड केली जाणार आहे,

## महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्यावतीने शहरात तिरंगा बाईक रॅली



**कोल्हापूर :** भारतीय हज समिती आणि महाराष्ट्र राज्य हज समितीच्या वतीने १३ ऑगस्ट पासून हज यात्रेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी सुरुवात करण्यात आली असून कोल्हापूर जिल्ह्यातील या यात्रेसाठी जाण्यास इच्छुक स्त्री पुरुष हज यात्रेकरूंसाठी मोफत ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया गुरुवारी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजल्यापासून सुरू करण्यात येणार असल्याची माहिती हज फौंडेशनचे अध्यक्ष समीर मुजावर आणि लिमरास चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष हाजी इक्बाल देसाई यांनी दिली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील हज यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरूंनी डिसेंबर २०२६ पर्यंत वैध असणाऱ्या पासपोर्टच्या छायांकित प्रति,पासपोर्ट आकाराचे दोन रंगीत फोटो (ज्यामध्ये मागील बाजू पांढऱ्या रंगाची असेल आणि समोरून दोन्ही कान दिसतील ), तसेच दोन नातेवाईकांचे आधारकार्ड,त्यांचे मोबाईल क्रमांक,पॅन कार्ड ,आधारकार्डच्या छायांकित प्रति आशा कागदपत्रांसह १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता मुस्लिम बोर्डिंग मध्ये उपस्थित रहावे असे हज फौंडेशन आणि लिमरास चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने कळविण्यात आले आहे.अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ९ सप्टेंबर २०२४ पर्यंत देण्यात आली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा,गडहिंग्लज, पेठ वडगाव, चंदगड, इचलकरंजी, जयसिंगपुर, कुरुंदवाड याठिकाणी सुद्धा हज यात्रेकरूंचे ऑनलाईन फॉर्म भरून घेण्यात येणार आहेत.

# हज यात्रा २०२५ साठी ऑनलाईन अर्ज भरण्यास सुरुवात

**कोल्हापूर :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव राज्यात व देशात मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या अंतर्गत हर घर तिरंगा उपक्रम राबविण्यात येत असून यानिमित्त महापालिकेच्यावतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी महापालिकेच्या अग्निशनम विभागाच्यावतीने शहरातील मुख्य मार्गावरुन बाईकवरुन तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.

या तिरंगा रॅलीची सुरुवात ताराबाई पार्क येथील सासने मैदान येथून प्रशासक के. मंजूलक्ष्मी यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी अतिरिक्त आयुक्त राहूल रोकडे, मुख्य अग्निशमन अधिकारी मनिष रणभिसे उपस्थित होते. यावेळी प्रशासक के.मंजूलक्ष्मी म्हणाल्या दि.१५ ऑगस्ट २०२४ च्या आधिपासून सर्वांनी आपआपल्या घरांवर तिरंगा ध्वज फडकवावा. आपण भारतीय आहोत याचा सर्वांना गर्व आहे. आपला पुढच्या पिढीला स्वातंत्र्याबद्दल माहिती व्हावी म्हणूनच केंद्र शासन व राज्य शासनाने हर घर तिरंगा हा उपक्रम राबविला आहे. याचाच एक भाग म्हणून महापालिकेने विविध कार्यक्रम आयोजीत केले आहेत. तिरंगा सेल्फी पॉईट शाळेत व महापालिच्या कार्यालयात केले आहेत. तिरंगा रॅली, रांगोळी स्पर्धा, तिरंगा कॅनवास, पेंटींग, बचत गटांचे स्टॉल्स असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी सर्व अग्शिनम जवान व ऑल इंडिया इंन्स्टीट्यूट फायर ट्रेनिंगचे विद्यार्थ्यांनी बाईकवरुन हि रॅली सासने मैदान ते धैर्यप्रसाद चौक ते कावळा नाका ते एसटी स्टॅण्ड ते दाभोळकर कॉर्नर ते व्हिनस कॉर्नर ते विल्सन पूल ते रिलायन्स मॉल ते उमा टॉकीज चौक ते सावित्रीबाई फुले हॉस्पीटल ते शिवाजी स्टेडियम ते मिरजकर तिकटी ते बिनखांबी गणेश मंदीर ते महाद्वार रोड ते पापाची तिकटी ते महापालिका मुख्य इमारत या मार्गावरुन काढण्यात आली. यावेळी या रॅलीमध्ये भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणा देण्यात आल्या.

या रॅलीमध्ये स्थानक अधिकारी दस्तगीर मुल्ला, कांता बांदेकर, जयवंत खोत, ओंकार खेडकर, अग्निशमन विभागाकडील ५० जवान,ऑल इंडिया इंन्स्टीट्यूटच्या फायर ट्रेनिंगचे ३० विद्यार्थी, खराडे कॉलेज ऑफ फायर ट्रेनिंगचे ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा मेळावा यंत्रणांनी समन्वयाने यशस्वी करावा : पालकमंत्री

**सातारा :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत सातारा जिल्ह्याने अत्यंत उल्लेखनीय काम केले आहे. या योजनेचा मेळावा रविवार दि. १८ ऑगस्ट रोजी सैनिक स्कूलच्या मैदानावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत होणार आहे. या मेळाव्यास सुमारे ५० हजार महिला येणार असून यंत्रणांनी समन्वयाने काम करुन मेळावा यशस्वी करावा, असे निर्देश पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील रविवारी होणाऱ्या मेळाव्याविषयी आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्ष समीर शेख, उपवनसंरक्षक आदिती भारद्वाज, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, उपजिल्हाधिकारी विक्रांत चव्हाण यांच्यासह प्रांताधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत पालकमंत्री श्री. देसाई यांनी जिल्ह्याच्या विविध भागातून सुमारे ५० हजार महिला या मेळाव्यासाठी उपस्थित राहणार आहे.

## शहीद कर्नल संतोष महाडिक स्मृती उद्यानाच्या जागेचा प्रश्न तत्काळ मार्गी लावावा : शंभूराज देसाई


**सातारा :** सातारा तालुक्यातील आरे गाव येथे शहीद कर्नल संतोष महाडिक स्मृती उद्यानासाठी जागेचा प्रश्न बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे. यासंदर्भात त्यांच्या मातोश्री कालिंदी महाडिक व चुलत बंधू यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री शंभूराज देसाई यांची भेट घेतली. आरे गाव येथे शहीद कर्नल संतोष महाडिक यांच्या स्मृती उद्यानासाठी ३७ गुंठे जमीन देण्यात येणार आहे. या ठिकाणी महसूल विभागाने त्वरित भेट देऊन जमीन मोजणी करुन द्यावी व सरकारी आदेश काढावा, असे निर्देश पालकमंत्री श्री. देसाई यांनी दिले.

देशासाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या कर्नल संतोष महाडिक यांच्या मातोश्री स्वत: इतके वर्ष याविषयी पाठपुरावा करीत आहेत. यंत्रणेने हा विषयक प्रधान्याने व संवेदनशीलपणे मार्गी लावावा, असे निर्देशही पालकमंत्री श्री. देसाई यांनी दिले. यावेळी त्यांनी श्रीमती कालिंदी महाडिक यांना अत्यंत आदराने बोलावून घेत त्यांचा विषय ऐकून घेतला आणि महसूल विभागाला तत्काळ स्थळ पाहणीच्या सूचना दिल्या. त्याचबरोबर येणाऱ्या १५ ऑगस्टपासून वॉर मेमोरियलला १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व १ मे

## स्व. राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना

# चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार शिवाजी साटम यांना जाहीर

**मुंबई :** राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने सन २०२३ चा स्व.राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना तर चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना जाहीर झाला आहे. स्व. राज कपूर विशेष योगदान पुरस्कार ज्येष्ठ लेखक, दिग्दर्शक, संकलक एन.चंद्रा आणि चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार लेखक, दिग्दर्शक तसेच अभिनेता दिग्पाल लांजेकर यांना जाहीर करण्यात आला आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी बुधवारी या पुरस्कारांची घोषणा केली असून दिनांक २१ ऑगस्ट रोजी एका विशेष समारंभात या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.



स्व.राज कपूर जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप रुपये १० लाख, मानपत्र व मानचिन्ह असे असून स्व. राज कपूर विशेष योगदान पुरस्काराचे स्वरूप रुपये ६ लाख, मानपत्र व मानचिन्ह असे आहे. चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप रुपये १० लाख, मानपत्र व मानचिन्ह असे आहे. तर चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्काराचे स्वरूप रुपये ६ लाख, मानपत्र व मानचिन्ह असे आहे.

'राज्याचेच नव्हे तर देशाचे सांस्कृतिक क्षेत्र समृद्ध करणाऱ्या या कलाकारांचा सर्वांना अभिमान आहे. त्यांना पुरस्कार जाहीर करतांना मनापासून आनंद होत आहे. हे सर्वजण सांस्कृतिक क्षेत्राचा गौरव अधिकाधिक उंचावत राहतील', अशा शब्दात मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी पुरस्कार प्राप्त कलावंतांचे अभिनंदन केले.

दरम्यान, पुरस्कार वितरण समारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बुधवार, २१ ऑगस्ट २०२४ रोजी, सायंकाळी ७ वाजता एनएससीआय (छडउख) डोम, वरळी मुंबई येथे होणार असल्याची माहिती महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील यांनी दिली आहे.

# एकनाथ शिंदे ॲक्शन मोडमध्ये, दिले 'हे' महत्वपूर्ण निर्देश

**मुंबई :** गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील मोठया सणांपैकी एक सण आहे. हाच सण निर्विघनपणे पार पडावा यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृह एक आढावा बैठक घेतली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना अनके निर्देश दिले. चला या निर्देशांबद्दल जाणून घेऊया.



राज्यातील गणेशोत्सव धुमधडाक्यात साजरा व्हावा म्हणून मुख्यमंत्री यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे गणेशोत्सवानिमित्त कायदा व सुव्यवस्थेचा आढावा आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याबाबत बैठक घेतली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसकर, मुंबई उपनगर पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, व इत्यादी मान्यवर या बैठकीस उपस्थित होते.

राज्यात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करावा. गणेशोत्सवापूर्वी राज्यात सर्वत्र गणपती आगमन आणि विसर्जन मार्गावरील खड्डे तातडीने बुजवावेत त्यासाठी रॅपीड क्वीक सेटिंग हार्डनर-एम सिक्टी या आधुनिक साहित्याचा वापर करावा. झाडांच्या फांद्याची छाटणी करावी. कृत्रिम तलावांची संख्या वाढवावी. मोठ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी आरोग्य पथक, रुग्णवाहिका, अग्निशमन वाहन तैनात करावेत असे निर्देश देऊन गणेशोत्सवासाठी गावी जाणाऱ्या गणेश भक्तांना यंदाही टोल माफीचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केला.

या बैठकी दरम्यान मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले, राज्यात गणेशोत्सवाच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने आवश्यक त्या तातडीच्या कामांना प्राधान्य दिले पाहिजे. गेल्या वर्षी ज्या सार्वजनिक गणेश मंडळांना परवानगी दिली होती ती यावर्षीही कायम राहील त्यासाठी शुल्क आकारणी करू नये. मंडळांना ज्या अन्य परवानग्या लागतात त्यासाठी एक खिडकी य़ोजना राबवावी. गणेश आगमन आणि विसर्जन मार्गावर मिरवणुकीदरम्यान अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी तातडीने करावी. खड्डे बुजवताना आधुनिक तंत्रज्ञनाच्या वापराने बनविण्यात आलेले साहित्य वापरावे. खड्डे बुजविण्याकामी हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल.

राज्यातील सर्वच मोठ्या शहरांमध्ये गणपती आगमन आणि विसर्जन मार्गावरील खड्डे बुजवण्यासाठी रॅपीड क्वीक सेटिंग हार्डनर-एम सिक्टी या आधुनिक साहित्याचा वापर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांना दिले. मोठ्या सार्वजनिक गणेश मंडळांच्या ठिकाणी भाविकांची मोठी गर्दी होते. अशा ठिकाणी आरोग्य पथक, रुग्णवाहिका, अग्निशमन वाहन तैनात करावेत.

महापालिकांनी गणेशोत्सव मंडळांच्या ठिकाणी तैनात केलेल्या अग्निशमन वाहनासाठी कुठलेही शुल्क आकारणी करू नये, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. सर्वत्र पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा व्हावा यासाठी मंडळांनी देखील सहकार्य करावे. मूर्ती विसर्जनासाठी महापालिकांनी कृत्रिम तलावांची संख्या वाढवावी, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. पुणे येथील एका संस्थेने विसर्जित केलेल्या शाडू मातीच्या मुर्तींचा पुनर्वापराचा प्रयोग केला असून त्यांनी पुनरावर्तन हा उपक्रम सुरू केला आहे. राज्यात सर्वच महापालिकांनी हा उपक्रम राबवावा, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.



पुस्तक प्रकाशन करताना मान्यवर.

## लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित सर्व भाषेतील पुस्तक प्रकाशन संपन्न

**दौंड :** प्रसिद्ध लेखक आणि पाणी पत्रकार विस्वास पाटील यांनी लिहिलेल्या आणि भारतीय पातळीवरील नवी दिल्ली येथील साहित्य अकादमी संस्थेने प्रकाशित केलेल्या मराठी साहित्याचे मानदंड आणि लोकशाहिर अण्णा भाऊ साठे जीवनावर आधारित अण्णा भाऊ दि अप होल्डर आफ दलित वुमन लिटरेचर भारतीय सर्व भाषेत लिहीलेल्या पुस्तकांचे प्रकाशन माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांचे हस्ते करण्यात आले.

सदर पुस्तकांचे प्रकाशन आणखी लोकार्पण सोहळा पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द समिक्षक आणि साहित्यिक डॉ. रावसाहेब कसबे हे होते.

राज्य कामगार सुरक्षा दल, विवीध सामाजिक संस्था, झोपडपट्टी सुरक्षा दलाचे अध्यक्ष भगवानराव वैराट यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी पार पडला.

यावेळी भाजपाचे राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे,

साहित्य अकादमी संस्थेचे सचिव शरिनिवासराव, जेष्ठ साहित्यिक प्रा. रतनलाल सोनोग्रा. राज देशमुख, सावित्रीच्या लेकी फौंडेशनच्या डॉ. मंजुश्री घाडगे या मान्यवर. यांचं सह अण्णा भाऊ साठे साठे साहित्य प्रेमी, कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थीत होते.

विशेष ---- प्रसिध्द लेखक विस्वास पाटील यांच्या लेखनीने साकार झालेल्या आणि भारतीय. प्रमुख भाषेत प्रकाशित करण्यात आलेल्या अण्णा भाऊ साठे यांच्या या पुस्तकामुळे अण्णा भाऊ साठे यांच्या मराठीवाचक यांचेसह देशभरातील विविध प्रकारच्या भाषेतील वाचकांना हि एक पर्वणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# तिरंगा देशभक्ती दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद

**कोल्हापूर :** देशाचा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यासाठी, प्रत्येक भारतीयाला राष्ट्रध्वज, तिरंगा फडकवण्यासाठी प्रोत्साहीत करुन नागरिकांमध्ये देशभक्ती आणि राष्ट्र अभिमानाची भावना जागृत करण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे पोलीस परेड ग्राऊंड, कसबा बावडा, कोल्हापूर येथे तिरंगा देशभक्ती दौडचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी उपस्थित सहभीगींना शुभेच्छा देवून ध्वज दाखवून शुभारंभ केला.

हर घर तिरंगा ही आपल्या देशामध्ये लोक चळवळ बनलेली आहे. स्वातंत्र्य सैनिक आणि वीर हुतात्मे यांच्या राष्ट्रभक्तीचा, त्यांच्या बलिदानाचा सन्मान आणि भारताच्या सर्वांगिण विकासासाठी आपण सर्वांनीच कटिबद्ध होणे हा प्रत्येक भारतीयाचा सन्मान व कर्तव्य आहे. यावेळी अशा आशयाची प्रतिज्ञा सर्व रनर्सला देण्यात आली. यावेळी अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, उपजिल्हाधिकारी संपत खिलारी, जिल्हा उपनिबंधक निलकंठ करे, तहसीलदार तथा जिल्हा करमणूक अधिकारी सैपन नदाफ यांच्यासह इतर विभाग प्रमुख, अधिकारी कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तिरंगा दौड २०२४ पोलीस क्रीडांगण येथून सुरू झाली पुढे पितळी गणपती, धैर्यप्रसाद चौक, आदित्य कॉर्नर, जिल्हाधिकारी कार्यालय, सी.पी.आर. चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, भवानी मंडप व बिंदू चौक व परत पोलीस ग्राऊंड असा धावण्याचा मार्ग होता. यामध्ये ३ कि.मी., ५ कि.मी. व १० कि.मी. धावण्यासाठी वेगवेगळ्या धावपटूंनी सहभाग नोंदविला. पोलीस क्रीडांगणावर परतल्यानंतर सर्वांनी सेल्फी केंद्रावर तिरंगा संदेश असलेल्या ठिकाणी छायाचित्र घेतले. तसेच त्या ठिकाणी तिरंगा संदेश फलक अर्थात साईन बोर्ड ठेवण्यात आला होता. त्याठिकाणीही मोठ्या प्रमाणात धावपटूंनी स्वाक्षरी व संदेश लिहले.



मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहुपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# पोलीस अधीक्षक समीर शेख यांना विशेष सेवा पदक

## नक्षलवाद्यांच्या कारवायांना आळा घातल्याबद्दल सन्मान



**सातारा** : साताऱ्याचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्यासह एकूण सात जणांना विशेष सेवा पदक जाहीर झाले आहे .नक्षलवाद्यांच्या हिंसक व बेकायदेशीर कारवायांना परिणामकारक आळा घालण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल हे पदक जाहीर झाले आहे विषय सेवा पदक जाहीर झालेल्यांमध्ये पोलीस अधीक्षक समीर शेख, फौजदार परितोष दातीर, तेजस्विनी देशमुख, सचिन भिलारी, अविनाश गवळी, मच्छिंद्रनाथ पाटील, प्रिया पाटील अशी सातारा जिल्ह्यात सध्या कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे आहेत

एस पी समीर शेख यांची नोव्हेंबर २०२३ मध्ये सातारा पोलीस अधीक्षक म्हणून नियुक्ती झाली होती २०२१ ते २०२३ या कालावधीत ते गडचिरोली येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून कर्तव्य बजावत होते. समीर शेख हे गडचिरोली येथे असताना त्यांनी पोलीस प्रशासनाची धुरा सांभाळली याशिवाय अनेक मोहिमांमध्ये सक्रिय भाग घेऊन त्या मोहिमा यशस्वी केल्या .त्यानंतर दोन वर्षे तेथे सेवा बजावल्यावर साताऱ्यात पोलीस अधीक्षक म्हणून ते रुजू झाले

गडचिरोली पोलीस दादालोरा खिडकीच्या माध्यमातून तेथील नागरिकांना वेगवेगळ्या योजना मिळण्यासाठी ही योजना समीर शेख यांनी सुरू केली समीर शेख यांनीही अभिनव योजना सुरू करून दोन वर्षात अडीच लाख लोकांपर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले. यामुळे शासनाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली त्यामुळेच त्यांना हे पदक जाहीर झाले आहे.

# साताऱ्यात विमानतळ आणि विमान उद्योग यावेत : भाजपाची मागणी

सातारा : सातारा विधानसभा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ , आणि विमान तयार करण्यासाठी आणि वाहतुकीसाठी लागणारे स्पेअर पार्ट्स उत्पादित किंवा तयार करण्याचे उद्योग सातारा विधानसभा क्षेत्रात तयार करावेत अशी मागणी भारतीय जनता पार्टी , सातारा शहराध्यक्ष विकास गोसावी यांनी , केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री ना श्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे कराड येथील बैठकीमध्ये केली

सातारा जिल्हा हा पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण यांना जोडणारा महत्वाचा जिल्हा असल्यामुळे या ठिकाणची औद्योगिक वसाहत सुद्धा खूपच महत्त्वाची आहे, जर सातारा विधानसभेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ झाले तर भारतातल्या इतर राज्यातील आणि आंतरराष्ट्रीय उद्योग साताऱ्यात येतील आणि साताऱ्याच्या एमआयडीसीचा तसेच साताऱ्याचा विकास होऊन साताऱ्यातील युवकांना कामगारांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीमध्ये उद्योगांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे

त्याच प्रमाणे ,सातारा शहर आणि तालुका , महाराष्ट्रातील एक अत्यंत महत्त्वाचे ऐतिहासिक दर्जाचे शहर आहे, सातारा शहरा पासून जवळच युनेस्को आणि आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त दर्जाचे कास पुष्प पठार असून सातारा विधानसभा क्षेत्राला निसर्ग संपत्तीची भरपूर देणगी लाभलेली आहे, या निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेण्यासाठी महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारत देशातील आणि विदेशातील पर्यटक सुद्धा मोठ्या प्रमाणावर येत असतात , या पर्यटकांना मुंबई किंवा पुणे या ठिकाणी विमानाने येऊन रस्त्याने प्रवास करावा लागतो , त्यामुळे काही पर्यटक टाळाटाळ करतात आणि याच कारणामुळे साताऱ्याच्या निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेण्यास मुकतात , त्यामुळे पर्यटन वाढीसाठी विमानतळ महत्वाचे ठरणार आहे

तसेच ,विमान तयार करण्यासाठी आणि वाहतुकीसाठी लागणारे स्पेअर पार्ट्स उत्पादित किंवा तयार करण्याचे उद्योग साताऱ्यात आले तर त्यामुळे साताऱ्यातील युवकांना रोजगार उपलब्धतेसाठी खूप मोठा हातभार लागणार आहे

या आणि इतर सर्व विषयांचा विचार करून सातारा विधानसभा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ व्हावे अशी मागणी करण्यात आली

यावेळी सातारा विधानसभा निवडणूक प्रमुख अविनाश कदम , जिल्हा सरचिटणीस विठ्ठल बलशेटवार, सातारा ग्रामीण पश्चिम मंडल अध्यक्ष महेश गाडे, जावळी मंडल अध्यक्ष श्रीहरी गोळे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष आणि नगरसेवक धनंजय जांभळे, ॲड प्रशांत खामकर, राहुल शिवनामे, धनंजय पाटील, सातारा शहर सरचिटणीस प्रवीण शहाणे, नितीन कदम , सातारा ग्रामीण सरचिटणीस वैभव यादव , युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष विक्रम बोराटे, सोशल मीडिया अध्यक्ष

# निष्पक्ष तपास करून अहवाल द्या

## आमदार गोरे विरुद्धच्या प्रकरणात न्यायालयाचे निर्देश

**मायणी** : संपूर्ण महाराष्ट्रभर गाजत असलेला मायणी मेडिकल कॉलेज कोविड प्रकरणात खटाव माणचे भाजप आमदार जयकुमार गोरे यांचा सहभाग असलेल्या कोरोना उपचार घोटाळाप्रकरणी उच्च न्यायालयाने राज्य सरकारला सोमवारी धारेवर धरले. गोरे यांना वाचवण्यासाठी तक्रारदारालाच आरोपी बनविण्यात येऊन त्याच्या घरावर ईडीला छापा टाकायला लावल्याचा याचिकाकर्त्यांनी आरोप केला त्यावर न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने संताप व्यक्त केला.

भाजप आमदार जयकुमार गोरे, त्यांची पत्नी व इतर साथीदारांनी कोरोना काळात २०० हून अधिक मृत रुग्णांना जिवंत दाखवून सरकारी योजनांमधून कोट्यवधी रुपये लाटले, असा आरोप करत मायणी येथील दीपक देशमुख यांनी ॲड. वैभव गायकवाड यांच्यामार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

याचिकेवर न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. मुख्य सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी सातारा(वडूज) पोलिसांची बाजू मांडली वआमदार गोरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केल्याची माहिती त्यांनी न्यायालयाला दिली.

याचिकाकर्त्या दिपक देशमुख यांच्यावतीने ॲड. सतिश मानेशिंदे यांनी पोलिसांच्या कामाच्या कार्यपध्दतीवर आक्षेप घेतला. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर पोलिसांनी गोरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. मात्र हा गुन्हा नोंदवताना दिपक देशमुख यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करून महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या अधिकाऱ्याच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल केला. पोलिसांनी जाणूनबुजून गोरे यांना पाठीशी घालण्यासाठी हा प्रकार केला आहे असा आरोप करताना, पोलीस या प्रकरणात पूर्णपणे पक्षपाती वागत असल्याचा दावा ॲड. मानेशिंदे यांनी केला.

खंडपीठाने या याचिकेची दखल घेत सदर घोटाळ्याचा तपास करताना पोलीस सूडभावनेने वागत आसल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याचे मत व्यक्त करताना कुणाच्याहि दबावाखाली अथवा कुणाच्याही सांगण्यावरून तपास करू नका, निष्पाप व्यक्तींना बळीचा बकरा बनवू नका, अशाप्रकारे तपास करणार असाल तर आम्ही पोलिसांची गय करणार नाही, अशी तंबी मा न्यायालयाने दिली. तक्रारदार दिपक देशमुख यांचा अतिरिक्त जबाब नोंदवून घेण्याचे निर्देश वडूज पोलिसांना देत घोटाळ्याचां अधिक तपासाचा अहवाल तीन आठवड्यांत सादर करण्याचे आदेश खंडपीठाने पोलिसांना दिले आहेत.

# क्राईम

## ग्रेड सेपरेटरमधील मारहाण प्रकरणी सहा जणांवर गुन्हा

**सातारा** : ग्रेड सेपरेटरमध्ये एका अल्पवयीन मुलास मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १२ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास वाय सी कॉलेज समोर असणाऱ्या ग्रेड सेपरेटरमध्ये साहिल प्रवीण साबळे रा. शिवथर, ता. सातारा या विद्यार्थ्यास हत्यार व लाथा बुक्क्यांनी मार केल्याप्रकरणी साहिल इनामदार व त्याच्या सोबत असलेल्या पाच अनोळखी इसमांवर (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही) सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास महिला पोलीस नाईक बोराटे करीत आहेत.

## युवती बेपत्ता

**सातारा** : सातारा शहर परिसरातून एक २२ वर्षीय युवती बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ११ रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास सातारा शहरानजीक असलेल्या संगम माहुली परिसरातील राहत्या घरातून एक २२ वर्षीय युवती निघून गेल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. अधिक तपास महिला पोलीस नाईक कदम करीत आहेत.

## सातारा बस स्थानकातून मंगळसूत्राची चोरी

**सातारा** : सातारा बस स्थानकातून अज्ञात चोरट्याने मंगळसूत्राची चोरी केल्याची फिर्याद सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. १० रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास साधना बाळकृष्ण चव्हाण रा. नेर, ता. खटाव जि. सातारा या सातारा बस स्थानकात बस मधून खाली उतरत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील ४५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेले आहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार सपकाळ करीत आहेत.

## मोबाईल स्नॅचिंग प्रकरणी तीन अज्ञातांवर गुन्हा

**सातारा** : जबरदस्तीने मोबाईल फोन हिसकावून नेल्याप्रकरणी तीन अज्ञातांविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ११ रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास राधिका चौक ते कोटेश्वर मंदिर जाणाऱ्या रस्त्यावर कोमल धनाजी माने सध्या रा. शाहूपुरी, सातारा यांच्या मैत्रिणीचा मोबाईल फोन दुचाकीवरून आलेल्या अज्ञात तीन चोरट्यांनी हिसकावून जबरदस्तीने चोरून नेला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार घोडके करीत आहेत.

## शाहूपुरी पोलिसांकडून ८ लाख ८० हजारचा मुद्देमाल मूळ मालकाला परत

**सातारा** : शाहूपुरी पोलिसांनी घरफोडीमध्ये चोरी झालेले १५ तोळे वजनाचे दागिने आणि ९६ हजार रुपये रोख असा ८ लाख ८० हजार सातशे पन्नास रुपयाचा मुद्देमाल मूळ मालकास परत मिळवून दिला आहे या धडक कारवाई बद्दल पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी शाहूपुरी पोलिसांच्या अभिनंदन केले आहे

दिनांक २६ मे २०१९ रोजी राजकुमार रामचंद्र उधानी राहणार लोखंडे कॉलनी शुक्रवार पेठ यांच्या घरी झाली होती .या घरफोडीत १५ तोळे वजनाचे दागिने ९६ हजार रुपये रोख रक्कम चोरी करण्यात आली होती. शाहूपुरी पोलिसांनी या गुन्ह्याची नोंद करून तपासाला सुरुवात केली. अवघ्या २४ तासाच्या आत घरफोडीतील आरोपीला अटक करून त्याच्याकडून १५ तोळे वजनाचे दागिने आणि ९६ हजार रुपये रोख असा ८ लाख ८० हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला होता. हे सोन्याचे दागिने व रोख रक्कम मंगळवारी पोलिस अधीक्षक समीर शेख यांच्या हस्ते मूळ मालकाला परत देण्यात आले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक ऑचल दलाल व उपाधीक्षक राजीव नवले यावेळी उपस्थित होते.

# कोयना प्रकल्पाला १ हजार कोटीची मान्यता




**पाटण** : कोयना जलविद्युत प्रकल्पाचा बहुउद्देशीय प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि गेल्या १० वर्षांपासून सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी रखडलेल्या कोयना जलविद्युत प्रकल्पाला नुकतीच १ हजार ३३६ कोटी रुपयांच्या निधीची मान्यता मिळाली आहे. कोयना धरणाच्या डाव्या तीरावर पायथा वीजगृह उभारण्यात येणार आहे. जलसंपदा विभाग आणि महानिर्मिती कंपनीच्या सकारात्मक भूमिकेमुळे या बहुउद्देशीय प्रकल्पाला संजीवनी मिळाली. जलसंपदा व महानिर्मिती कंपनीमध्ये कोयना डावा तीर धरण पायथा उदंचन जलविद्युत गृह उभारणीसाठी सामंजस्य करार झाला असून या प्रकल्पाच्या उभारणीसाठी तब्बल १ हजार ३३६ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. तसेच ४ वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याच्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात मंगळवारी उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, जलसंपदा विभाग आणि महानिर्मिती कंपनी यांच्यामध्ये हा सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारावर महानिर्मिती कंपनीतर्फे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. एन. बलगन यांनी तर जलसंपदा विभागातर्फे कार्यकारी संचालक अतुल कपोले यांनी स्वाक्षरी केल्या. सातारा जिल्ह्यातील कोयना धरण पायथा येथे ४० मेगावॅट क्षमतेच्या दोन उदंचन जलविद्युत संचांची उभारणी करण्यात येणार आहे. या प्रकल्प उभारणीचे प्राथमिक काम जलसंपदा विभागातर्फे करण्यात आले आहे. उर्वरित प्रकल्प उभारणीचे काम महानिर्मिती व जलसंपदा विभागातर्फे संयुक्तरित्या पूर्ण करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाचा आणि उर्वरित कामाचा कोयना बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता विश्वनाथ सानप (कोयनानगर) यांनी सातत्याने पाठपुरावा केला असून आगामी ४ वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

याप्रसंगी ऊर्जा विभागाच्या अप्पर मुख्य सचिव श्रीमती आभा शुक्ला, महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) अभय हरणे, कार्यकारी संचालक पंकज नागदेवते, मुख्य अभियंता (प्रकल्प नियोजन) अतुल सोनजे व वरिष्ठ अधिकारी, जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव (लाक्षेवि) डॉ. संजय बेलसरे, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता व सहसचिव प्रसाद नार्वेकर, अधीक्षक अभियंता अरुण नाईक

# खटाव तालुक्यातील वीर पत्नींना दिली जमिनीची कब्जापटी

**मायणी** : देशसेवा बजवत असताना ज्या सैनिकांना मरण पत्करावे लागले अशा सैनिकाच्या वीर पत्नींना शासना मार्फत दिलासा देण्याचे काम सैनिक हो तुमच्यासाठी शासन आपल्या दारी या उपक्रमा अंतर्गत महसुल पंधरवडडा सुरू असून या निमित्ताने वडूज(खटाव) तहसीलदार बाई माने व कर्मचार्यानी वीर पत्नींना लाभ म्हणून पाच एकर जमीनीचा कब्जा जागेवर जाऊन प्रत्यक्ष लाभ दिला .

खटाव तालुक्यामध्ये महसूल पंधरवडा अंतर्गत सैनिक हो तुमच्यासाठी कार्यक्रमांतर्गत तहसीलदार बाई माने यांच्या दालनात माजी सैनिक यांची बैठक घेऊन सर्व माजी सैनिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. खटाव तालुक्यातील विखळे गावच्या वीर पत्नी श्रीमती पद्मावती नवनाथ जगदाळे यांना ढोकळवाडी येथील गट नंबर ४० मधील पाच एकर जमिनीचा कब्जा दिला तर श्रीमती हेमलता नारायण साळुंखे यांना धोंडेवाडी येथील गट नंबर १२३ मधील पाच एकर जमिनीचा कब्जा दिला. यावेळी महसुल सहाय्यक नौशाद मुल्ला, मंडलाधिकारी अभय शिंदे, मंडलाधिकारी एच.एन.दीक्षित , एस .एम . बिडकर व एम. एच. चव्हाण या सर्व महसुल कर्मचार्यांनी महसुल पंधरावड्यात हिरारीने सहभाग घेतला. सातारा जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त जमीन मंजुरीचे आदेश हे खटाव तालुक्यामध्ये झालेले आहेत. २०१९ सालापासून प्रलंबित असलेल्या प्रकरणाचा पाठपुरावा संबंधीत महसुल कर्मचाऱ्यांनी केला. खटाव महसूल सहाय्यक, प्रांत कार्यालयातील विलास कर्पे, जिल्हाधिकारी कार्यालयातील नितीन घुगे, महेश गंगातीरकर व भूमी अभिलेखचे निमतानदार विश्वास लांडे याकामी यांचे सहकार्य लाभले.

# देशातील सर्वोत्कृष्ट औषधीय संस्थांमध्ये कराडच्या कृष्णा विश्व विद्यापीठाचा समावेश

## राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंगमध्ये महाराष्ट्रातील ८० शैक्षणिक संस्था



**कराड** : केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेद्र प्रधान यांनी भारतीय मानांकने २०२४ अहवाल जारी केला. भारतातील उच्च शिक्षण संस्थांच्या भारतीय मानांकनाचा अहवाल जारी होण्याचे हे सलग नव्वे वर्ष आहे.

राजधानीतील भारत मंडपम येथील सभागृहात, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्यावतीने उच्च शैक्षणिक संस्थांची राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग-२०२४ आज जाहीर करण्यात आली. शिक्षण, शिक्षण आणि संसाधने, शोध आणि व्यावसायिक कार्यप्रणाली, पदवी परिणाम, संपर्क आणि समावेशिता, कल्पना या मापदंडांवर एकूण १३ श्रेणींमध्ये सर्वोत्कृष्ट ८० संस्थांची यादी जाहीर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे वर्ष २०२४ पासून तीन नवीन श्रेणींचा समावेश करण्यात आला असून, यात राज्यांतील सर्वोत्कृष्ट विद्यापीठे, सर्वोत्कृष्ट मुक्त विद्यापीठे आणि कौशल्य विद्यापीठांचा समावेश करण्यात आला. यामध्ये पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठ या शैक्षणिक संस्थेला तीसऱ्या क्रमांकाचे सर्वोत्कृष्ट विद्यापीठाचे मान प्राप्त झाले.

या कार्यक्रमात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ सुकांती मुजुमदार, युजीसी अध्यक्ष प्रा. एम जगदीश कुमार, ऑल इंडिया कॉउंसिल ऑफ ट्रेनिंग अँड एजुकेशन अध्यक्ष प्रा. टी.जी. सिथाराम, शिक्षण मंत्रालयाचे सचिव के. संजय मूर्थी, सह सचिव गोविंद जयस्वाल यासह सर्व विद्यापीठांचे कुलगुरू व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सर्वोत्कृष्ट समग्र संस्थांमध्ये महाराष्ट्राच्या ११ संस्था...

संस्थात्मक रँकिंगच्या यादीत समग्र संस्थांच्या श्रेणीमध्ये निवडलेल्या देशातील १०० शैक्षणिक संस्थांमध्ये महाराष्ट्रातील ११ शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बॉम्बे या क्रमवारीत तीस-या स्थानावर आहे तर होमी भाभा राष्ट्रीय संस्था, मुंबई (२७), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (३७), भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था पुणे, (४२), सिम्बायोसिस इंटरनॅशनल पुणे, (५२), रसायनशास्त्र तंत्रज्ञान संस्था, मुंबई (५६), डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठ, पुणे (६३), दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एडुकेशियन अँड रीसर्च, वर्धा (७१), विश्वेश्वरैया राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपूर (७७), एस. व्ही. के. एम. ची नरसी मोंजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई (८४) तसेच टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स मुंबई (९८) क्रमांकावर आहे.

**विद्यापीठ रँकिंगमध्ये राज्यातील १९ विद्यापीठे...**

यादीत देशातल्या १०० सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या रँकिंगमध्ये महाराष्ट्रातील १० विद्यापीठांचा समावेश आहे. यात क्रमांक निहाय संस्थांचा समावेश - होमी भाभा राष्ट्रीय संस्था, मुंबई (१६), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे (२३) सिम्बायोसिस इंटरनॅशनल पुणे (३१), इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई (३५), दत्ता मेघे उच्च शिक्षण आणि संशोधन संस्था, वर्धा (४२), एस. व्ही. के. एम. ची नरसी मोंजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई (४९), टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स मुंबई (५८), मुंबई विद्यापीठ मुंबई (६१) तर भारती विद्यापीठ पुणे (७८) क्रमांकावर आहे.

**राज्य सार्वजनिक विद्यापीठे**

या वर्षापासून सर्व राज्यातील सार्वजनिक विद्याापीठांचा अवलोकन करण्यात आले असून यात राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे या विद्यापीठाने तिसरा क्रमांक मिळवला आहे. या सोबतच, मुंबई विद्यापीठ, मुंबई (१८), सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे (३३) आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (४६) क्रमांकावर राहिले आहेत.

**संशोधन संस्थांच्या रँकिंगमध्ये राज्यातील ५ संस्था...**

संशोधन संस्थांच्या रँकिंगमध्ये देशातील ५० संस्थामध्ये महाराष्ट्रातील ५ संस्थांचा समावेश आहे. यामध्ये चौथ्या क्रमांकावर भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई (४) आहे तर, होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्यूट बॉम्बे (६), टाटा मूलभूत संशोधन संस्था, मुंबई (१२), भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (२९) आणि इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी मुंबई (४०) व्या स्थानावर आहे.

**राज्यातील पाच अभियांत्रिकी संस्थांची रँकिंग...**

अभियांत्रिकी शिक्षण संस्थेच्या रँकिंगमध्ये देशातील १०० अभियांत्रिकी संस्थांमध्ये महाराष्ट्रातील पाच संस्थांचा समावेश आहे. यात भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई तिस-या क्रमांकावर, विश्वेश्वरैया राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान, नागपुर (३९), इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी बॉम्बे (४१), डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी पुणे (६३) तर सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे (७७) व्या स्थानावर राहिले आहे.

**चार महाविद्यालयांना मिळाली रँकिंग...**

महाविद्यालयांच्या रँकिंगमध्ये देशातील १०० महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्रातील ४ महाविद्यालयांचा समावेश आहे. यात फर्ग्युसन कॉलेज (स्वायत्त) पुणे (४५) क्रमांकावर, सरकारी विज्ञान संस्था, नागपूर (६४) व्या क्रमांकावर, सेंट झेवियर्स कॉलेज, मुंबई (८९) तर श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती (९९) वा स्थान प्राप्त केला आहे.

**राज्यातील नऊ व्यवस्थापन संस्थांना रँकिंग...**

देशातील १०० उत्कृष्ट व्यवस्थापन संस्थांमध्ये महाराष्ट्रातील ९ संस्थांचा समावेश आहे. यामध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मुंबई (६), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बॉम्बे (१०), सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट पुणे (१३), एस. व्ही. के. एम. नरसी मोंजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मुंबई (२०), एस.पी जैन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, मुंबई (२०), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट नागपूर (३१), के.जे. सोमैया इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसेराच मुंबई (६३), प्रिन्स. एल.एन वेलिंगकर व्यवस्थापन विकास आणि संशोधन संस्था, मुंबई (८४) तर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंट, पुणे (९१) वा क्रमांक मिळवला आहे.

# स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राज्यातील ५९ पोलिसांना पदके जाहीर

## मुंबईतील सदानंद राणे, हातिस्कर व होनमाने यांचा समावेश

**मुंबई :** स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राज्यातील १७ पोलिसांना शौर्यपदक, उल्लेखनीय सेवेसाठी तीन पोलिसांना, तर गुणवत्तापूर्ण सेवेसाठी ३९ पोलिसांना राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आले. नक्षलवाद्यांशी लढताना शहीद झालेले पोलीस उपनिरीक्षक धनाजी होनमाने यांनाही शौर्यपदक जाहीर करण्यात आले आहे. याशिवाय मुंबईत कार्यरत सहाय्यक पोलीस आयुक्त विजय हातिस्कर, आर्थिक गुन्हे शाखेतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सदानंद राणे व दहिसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक होनमाने यांनाही 'गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल राष्ट्रपतींचे पोलीस पदक जाहीर झाले.

अतिरिक्त पोलीस महासंचालक चिरंजीव रामच्छबिला प्रसाद, संचालक राजेंद्र डहाळे व पोलीस सह आयुक्त सतीश गोवेकर यांना उल्लेखनीय सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आले आहे. तसेच राज्यातील अधिकारी व कर्मचारी मिळून ३९ जणांना गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल राष्ट्रपतींचे पोलीस पदक जाहीर करण्यात आले आहे. नवी मुंबईतील रबाळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजीव धुमाळ यांनाही पदक जाहीर झाले आहेत. धुमाळ १८ वर्ष मुंबईतील खंडणी विरोधी पथकात कार्यरत होते. त्यांच्या कारकिर्दीत कुख्यात गँगस्टर संतोष शेट्टी, बंटी पांडे यांच्या अटकेसाठी धुमाळ यांनी महत्त्वपूर्ण



भूमिका बजावली होती. त्यांच्याशिवाय दत्तात्रय तुळशीदास शिंदे (उपमहानिरीक्षक), संदीप गजानन दिवाण (उपमहानिरीक्षक) व शिवाजी ज्ञानदेव फडतरे (उपमहाधीक्षक) यांनाही गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे.

मुंबईतील सदानंद राणे, हातिस्कर व होनमाने यांना पदके

आर्थिक गुन्हे शाखेतील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सदानंद राणे यांनाही 'गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल राष्ट्रपतींचे पोलीस पदक जाहीर झाले आहे. राणे यांनी उल्हासनगर, भिवंडी, नवी मंबई व मुंबई येथे कार्यरत असताना आपल्या कामची छाप उमटवली होती. मुंबईत कुर्ला येथील गुन्हे शाखा, ना. म. जोशी मार्ग व आर्थिक गुन्हे शाखेचे हाउसिंग युनीट १ चे येथे ते कार्यरत होते. भिवंडीसारख्या संवेदनशील शहरात काम करताना विविध गणेशोत्सव मंडळे, मशीद व्यवस्थापन यांच्यात समन्वय, नवी मुंबई येथील संवेदनशील अशा जेरोम सलढाणा यांचा खून, मुंबईतील इस्थर अनुहया प्रकरण, नवी मुंबई येथील मन्नपुरम गोल्डच्या दोन कोटींहून अधिक किंमतीच्या सोने दरोड्याची घटना अशा प्रकरणांची उकल त्यांनी केली आहे. आर्थिक गुन्हे विभागात कार्यरत असताना गुंतवणूक योजनांद्वारे फसवणूक झालेल्या पीडित गुंतवणूकदारांना न्यायालयीन कार्यवाहीने ५० कोटी रुपयांहून अधिक रक्कमांचा परतावा देण्याची कार्यवाही त्यांनी केली आहे.

गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त विजय हातिस्कर यांनाही गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. हातिस्कर रायगड, सिंधुदुर्ग येथे सुरुवात व नंतर १७ वर्ष मुंबई येथे सेवा केली असून रायगड आणि मुंबईतील आरसीएफ, मालाड या पोलीस ठाण्यामध्ये अनेक तपास केलेल्या गंभीर गुन्हामध्ये आरोपींना शिक्षा झाली होती. १९९५ तुकडीचे पोलीस अधिकारी असलेले अशोक होनमान यांनी नवी मुंबई, ठाणे, पालघर व मुंबई या ठिकाणी काम केले आहे. ते सध्या दहिसर पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. ते पालघर गुन्हे शाखा, भिवंडी गुन्हे शाखा, माणिकपूर पोलीस ठाणे अशा महत्त्वाच्या ठिकाणी कार्यरत होते.

## महाराष्ट्रातील पदक विजेत्यांची नावे

**शौर्य पदक विजेते**

डॉ. कुणाल शंकर सोनावणे - सब डिव्हिजनल पोलीस ऑफिसर
दीपक रंभाजी औटे - पोलीस उपनिरीक्षक
कै. धनाजी तानाजी होनमाने - पोलीस उपनिरीक्षक (मरणोत्तर)
नागेशकुमार बोंड्यालू मदारबोईना- नायक पोलीस हवालदार
शकिल युसूफ शेख- पोलीस हवालदार
विश्वनाथ समैय्या पेंडम - पोलीस हवालदार
विवेक मानकू नरोटे - पोलीस हवालदार
मोरेश्वर नामदेव पोटवी - पोलीस हवालदार
कैलास चुंगा कुळमेठे - पोलीस हवालदार
कोटला बोटू कोरामी - पोलीस हवालदार
कोर्के सन्नी वेलाडी- पोलीस हवालदार
महादेव विष्णू वानखेडे - पोलीस हवालदार
अनुज मिलिंद तरे - अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक
राहुल नामदेव नेव्हाडे- पोलीस उपनिरीक्षक
विजय दादासो सपकाळ - पोलीस उपनिरीक्षक
महेश बोरू मिच्छा- हेड कॉन्स्टेबल
समैय्या लिंगय्या असम - नायक पोलीस हवालदार

**उल्लेखनीय सेवा पदक**

चिरंजीव रामच्छबिला प्रसाद- अतिरिक्त महासंचालक, महाराष्ट्र
राजेंद्र बाजीराव डहाळे- संचालक, महाराष्ट्र
सतीश रघुवीर गोवेकर, पोलीस सहआयुक्त, महाराष्ट्र

**गुणवत्तापूर्ण सेवेबद्दल राष्ट्रपतींचे पोलीस पदक**

दत्तात्रय तुळशीदास शिंदे, उप महानिरीक्षक
संदीप गजानन दिवाण, उप महानिरीक्षक
शिवाजी ज्ञानदेव फडतरे, उप महाधीक्षक
संजय मारुती खांदे, महाधीक्षक
विनीत जयंत चौधरी, उप महाधीक्षक
प्रकाश पांडुरंग गायकवाड, उपनिरीक्षक
सदानंद जानबा राणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
विजय मोहन हातिस्कर, सहाय्यक पोलीस आयुक्त
महेश मोहनराव तराडे, उप महाधीक्षक
राजेश रमेश भागवत, निरीक्षक
गजानन कृष्णराव तांदूळकर, उपनिरीक्षक
राजेंद्र तुकाराम पाटील, उपनिरीक्षक
संजय साहो राणे, उपनिरीक्षक
गोविंद दादू शेवाळे, उपनिरीक्षक
मधुकर पोछा नैताम, उपनिरीक्षक
अशोक बापू होनमाने, निरीक्षक
शशिकांत शंकर तटकरे, उपनिरीक्षक
अक्षयवारनाथ जोखुराम शुक्ला, उपनिरीक्षक
शिवाजी गोविंद जुंदरे, उपनिरीक्षक
सुनील लयाप्पा हांडे, सहाय्यक उपनिरीक्षक
प्रकाश मोतीराम देशमुख, उपनिरीक्षक
दत्तू रामनाथ खुळे, सहाय्यक उपनिरीक्षक
रामदास नागेश पालशेतकर, निरीक्षक (पीए)
देविदास श्रावण वाघ, सहाय्यक उपनिरीक्षक
प्रकाश शंकर वाघमारे, सहाय्यक उपनिरीक्षक
संजय दयाराम पाटील, सहाय्यक उपनिरीक्षक
मोनिका सॅम्युअल थॉमस, सहाय्यक उपनिरीक्षक
बंडू बाबुराव ठाकरे, मुख्य शिपाई
गणेश मानाजी भामरे, मुख्य शिपाई
अरुण निवृत्ती खैरे, मुख्य शिपाई
दीपक नारायण टिल्लू, मुख्य शिपाई
राजेश तुकारामजी पैदलवार, मुख्य शिपाई
श्रीकृष्ण गंगाराम हिरपूरकर, सहाय्यक कमांडंट
राजू संपत सुर्वे, निरीक्षक
संजीव दत्तात्रेय धुमाळ, निरीक्षक
अनिल उत्तम काळे, सहाय्यक उपनिरीक्षक
मोहन रामचंद्र निखारे, सहाय्यक उपनिरीक्षक

# महावितरण प्रत्येक जिल्ह्यातील दोन गावांना शंभर टक्के सौर ऊर्जेद्वारे विजपुरवठा करणार

**मुंबई :** प्रत्येक जिल्ह्यातील दोन गावांना शंभर टक्के सौर ऊर्जे द्वारे वीज पुरवठा करण्याची योजना महावितरणने तयार केली असून निवड झालेल्या गावांना येत्या दोन महिन्यात सौर उर्जेद्वारे शंभर टक्के वीजपुरवठा करण्यात येणार आहे.

निवड झालेल्या गावात प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजने अंतर्गत घरगुती ग्राहकांना ३ किलोवॅट पर्यंत ७८००० रुपयांची सबसिडी देण्यात येणार असून पाणीपुरवठा व दिवाबत्ती योजनांच्या सौर ऊर्जीकरणासाठी शासकीय निधीतून पैसे उपलब्ध करण्यात येणार आहे. तसेच या गावातील सर्व वाणिज्यिक व औद्यगिक ग्राहकांना या योजनेत सहभागी होण्यासाठी महावितरण आवाहन करणार आहे.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत निवासी घरगुती ग्राहकांसाठी प्रति किलोवॅट ३०,००० रुपये अनुदान दोन किलोवॅट पर्यंत मिळते. तीन किलोवॅट पर्यंत अतिरिक्त एक किलोवॅट क्षमतेसाठी रु. १८,००० अनुदान मिळते. तीन किलोवॅटपेक्षा मोठ्या सिस्टीमसाठी एकूण अनुदान रु. ७८,००० पर्यंत मर्यादित आहे.

विशेष म्हणजे सातारा जिल्हयातील पाटण तालुक्यातील आदर्शगाव मान्याचीवाडी ह्या गावाला लवकरच शंभर टक्के सौर उर्जेव्दारे विद्युत पुरवठा करण्यात येणार असून हे गाव लवकरच सौरग्राम म्हणून नावलौकीकाला येणार आहे.

महावितरणव्दारे शंभर टक्के सौर उर्जेसाठी निवड करण्यात आलेल्या गावांची नावे कंसात दिलेली आहे - जालना जिल्हा (पातोडा,दारेगाव), बीड जिल्हा (नानदी, आनंदवाडी), लातूर जिल्हा (नवीन आदर्श कॉलनी, मयूरबन सोसायटी), हिंगोली जिल्हा (सुलदळी गोरे, दातेगाव ), नांदेड जिल्हा ( हाडोळी,दवणगिर), परभणी जिल्हा ( आंबेटाकळी, मुरूमखेडा), पेण मंडळ (पाडवी पठार, वडवल ), वाशी मंडळ ( नेरेपाडा गाव, सिवानसाई गाव), धुळे जिल्हा ( कलगाव, नाथे), जळगाव जिल्हा ( निंबोल, पातोंडी), नंदुरबार जिल्हा (मोहिदा, ब्राहमणपुरी), कल्याण मंडळ-१ ( शिरवली कुंभारली), कल्याण मंडळ-२ (गोलभान, मोहोप ), पालघर जिल्हा ( अक्करपट्टी, कोलगाव), वसई मंडळ (शिवनेरी, निर्वाण ), रत्नागिरी जिल्हा (फुरुस, असूर्डे), अहमदनगर जिल्हा ( पारेगाव, हिवरे बाजार), मालेगाव मंडळ (वाके, निंबोळा ), नाशिक मंडळ (कोनांबे, दारणा सांगवी), अकोला जिल्हा ( सौंदाळा, सांगलुड), बुलढाणा जिल्हा (बजरंग नगर-सागवान एरिया, सावजी लेआउट, सुताळा खुर्द), वाशिम जिल्हा ( झकलवाडी, पारवा ), अमरावती जिल्हा (नवाथे, काठोरा ), चंद्रपूर जिल्हा ( सोमनाथ, आनंदवन), गडचिरोली जिल्हा (कोंढाणा तुंबडी मेंढा ), भंडारा जिल्हा (भोसा, दहेगाव ), नागपूर ग्रामीण मंडळ (चिखली,सिंधी ), नागपूर शहर मंडळ ( किरमीती भारकस, कॉस्मोपॉलिटन),

वर्धा जिल्हा (नागझरी, नेरी मिर्जापुर ), बारामती मंडळ (वंजारवाडी कुंभारकर वस्ती, गणेश रोड नानगाव), सातारा जिल्हा ( मान्याची वाडी), सोलापूर जिल्हा ( चिंचणी, औज), कोल्हापूर जिल्हा (शेळकेवाडी, पिराचीवाडी ), सांगली जिल्हा (झुरेवाडी निमसोड ), गणेशखिंड मंडळ ( शिवतीर्थ नगर, सेक्टर २५ निगडी)

# मंत्रिमंडळ निर्णय : नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्षे

**मुंबई :** राज्यातील निवडून आलेल्या नगरपंचायतींच्या नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्षे करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

यासाठी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यात येतील. राज्यातील नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका २०२१-२२ मध्ये झाल्या असून त्याचा कालावधी अडीच वर्षांचा आहे. तो आता संपत असल्यामुळे हा कालावधी पाच वर्षाचा करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येईल.

डेक्कन कॉलेज, गोखले संस्था, टिळक महाराष्ट्र

डेक्कन कॉलेज, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या तीनही संस्था शासनाच्या अधिपत्याखालील अभिमत विद्यापिठे आहेत. त्यामुळे शासनाच्या अनुदानित महाविद्यालयांना लागू असलेली वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना त्यांना लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट शिथील यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट शिथील करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

# डीएसकेमधील ठेवीदार निर्णायक आंदोलनाच्या पवित्र्यात

**पुणे :** डीएसकेंच्या मालमत्ता विकून ठेवीदारांचे पैसे परत मिळू शकतात मात्र मालमत्ता चुकीच्या पद्धतीने विकल्या जात असून ही विक्री प्रक्रिया विशिष्ट खरेदीदारांसाठी राबवली जात असल्याने रद्द करण्यात यावी अशी मागणी आज ठेवीदारांची संघटना असलेल्या चैतन्य सेवाभावी संस्था (असोसिएशन ऑफ डीएसके फ्रॉड व्हिक्टिम्स) ने हिंदू महासंघाच्या सहकार्याने घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.यासंबंधी सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात येत असून मोर्चे,आंदोलने आणि सामुदायिक आत्मदहनाद्वारे निर्णायक लढाई लढू,असा इशारा या पत्रकार परिषदेत देण्यात आला.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात झालेल्या या पत्रकार परिषदेत हिंदू महासंघाच्या वतीने अध्यक्ष आनंद दवे,एड. नीता जोशी,सी ए आदिती जोशी,मनोज तारे,श्वेता कुलकर्णी,विद्या घटवाई,मेघा म्हसवडे,उमेश कुलकर्णी,नितीन जोशी तसेच ठेवीदार संघटनेचे दीपक फडणीस,श्रीकांत अडूळकर,सुधीर गोसावी उपस्थित होते.



डीएसके म्हणजे डी एस कुलकर्णी जेल मध्ये असताना प्रोसिजर फॉलो न करता जो रिसोल्युशन प्लॅन बनवला आहे तो संपूर्णतः बनावट असून तो खरेदी घेणाऱ्या लोकांसाठी बनवण्यात आलेला आहे व त्यामध्ये जमिनीचे बाजार व शासकीय मूल्य ठेवीदारांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ठेवी या बाबींचा विचार करण्यात आलेला नाही,असा आरोप या पत्रकार परिषदेत करण्यात आला.मालमत्ता विक्री करताना एकाकडून दुसऱ्याकडे नंतर तिसऱ्याकडे विक्री करून थर्ड पार्टी,फोर्थ पार्टी इंटरेस्ट तयार केले जात आहेत. राज्य सरकारचा हस्तक्षेप गरजेचा असून राजकीय नेते लक्ष देत नाहीत ,न्यायालयात ,एनसीएलटी मध्ये संथ गतीने प्रक्रिया चालतात ,न्यायाधीश बदलत राहतात,तारखा पडतात ,यातून ठेवीदार मेटाकुटीला आले आहेत. ३२ हजार पैकी २०० ठेवीदार मृत पावले आहेत ,अशी माहिती देण्यात आली. बँकांनी डीएसके यांच्या मालमत्तेचा लिलाव केला असता तर आता लिलावात जे पैसे मिळत आहेत त्या पेक्षा जास्त मिळाले असते आणि त्यातून ठेवीदारांना परत मिळाले असते ,असेही यावेळी सांगण्यात आले.

पत्रकार परिषदेत मांडण्यात आलेले प्रमुख मुद्दे :

१. २००० कोटी रेडी रेकनर असलेल्या म्हणजे बाजारभाव किमान ३००० ते ४००० कोटी असलेल्या ११ प्रॉपर्टी ची किंमत ८३० कोटी कशाच्या आधारे लावली, वॅल्युअर ला हाताशी धरून हा सर्व बनाव करण्यात आला.

२. सदरील रिसोल्युशन प्लॅन सदोष असताना पारित कसा करून घेण्यात आला, यात कोण दोषी आहे याची चौकशी व्हायला पाहिजे.

३. कायदा अश्या पद्धतीने लोकांना लुबाडण्याची संधी आयबीसी किंवा एनसीएलटी च्या माध्यमातून देत नाही, बऱ्याच स्तरावर लोकांना भ्रष्टाचारी मार्गाने आपलसं करून मोठी अफरातफरी करण्यात अली आहे आणि बत्तीस हजार ठेवी धारकांची फसवणूक करण्यात आली आहे.

४. अफेक्टयेड किंवा इंटरेस्टेड पार्टी म्हणून कोणीही प्रत्यक्ष चालू प्रक्रियेमध्ये आज पर्यंत सहभाग घेतला नाही तो आम्ही सुरवातीला कॅव्हेट व नंतर याचिका कर्ते / प्रतिवादी म्हणून आमचे म्हणेन ऐकून घ्यावे असा विनंती अर्ज / याचिका सर्वोच्च न्यायालयाला करणार आहोत.

# मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या जनता दरबाराला उदंड प्रतिसाद

**मुंबई :** राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा सिधुदुर्ग चे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांचा विधानसभा निहाय तीन दिवसीय जनता दरबार पार पडला. या जनता दरबाराला नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभला. नेहमीच्या कार्यशैलीप्रमाणे मंत्री रवींद्र चव्हाण यांनी नागरिकांच्या समस्येवर, तक्रारींवर तातडीने निर्णय घेत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. या जनता दरबारामुळे जिल्हावासीयांचे बराच काळ प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लावण्यात यश आल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जनसामान्यांचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी तीन दिवसीय विधानसभा मतदारसंघ निहाय जनता दरबाराचे



आयोजन करण्यात आले होते. सिंधुदुर्गातील सावंतवाडी विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील नागरिकांसाठी जनता दरबार बुधवारी ओरस येथील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे पार पडला. यावेळी सावंतवाडी परिसरातील नागरिकांनी आपले विविध प्रश्न पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्यासमोर मांडले. विविध शासकीय विभागाशी संबंधित असलेले जनसामान्यांचे प्रश्न नीट समजून घेत आणि ते सोडविण्यासाठी आवश्यक त्या सूचना मंत्री चव्हाण यांनी दिल्या.

सावंतवाडी विधानसभा मतदारसंघातील ३०१ पैकी २४० अर्ज तातडीने निकाली काढण्यात आले. उर्वरित अर्जांचे निराकरण देखील लवकरात लवकर करण्यात येईल असे मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सांगितले. तर कुडाळ विधानसभा मतदारसंघातील ३५९ अर्जांपैकी २८६ अर्जांचे तात्काळ निराकरण करण्यात आले. जनसामान्यांचे प्रश्न हे ठराविक कालमर्यादेत सोडवण्यात येतील, याचा आपण वेळोवेळी आढावा घ्यावा, असे निर्देश यावेळी त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले. या जनता दरबाराच्या माध्यमातून जिल्हावासीयांना सर्व शासकीय विभागांशी संबंधित प्रश्न एकाच ठिकाणी सोडविण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले. गेल्या ३ दिवसांत जिल्ह्यातील अनेक समस्या मार्गी लावण्यात आल्या असून त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी माजी आमदार राजन तेली, अतिरिक्त जिल्हाधिकारी शंकर बरगे, पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, सीईओ मकरंद देशपांडे, भाजपा सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

कणकवली विधानसभा क्षेत्रनिहाय जनता दरबारात गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कातकरी समाजाच्या घराचा प्रश्न निकाली काढण्यात आला. ज्या कातकरी समाजाला आजवर भूमिहीन रहावे लागले, त्या समाजातील सुमारे ७०-७५ कुटुंबांना ओसरगांव येथून अवघ्या ५०० मी. अंतरावर असणारी जमीन उपलब्ध करून देण्यात आली. यामुळे या कुटुंबांना हक्काचे घर मिळाले. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. आपले स्वप्नं पूर्ण झाल्याने कातकरी समाजाने मंत्री रवींद्र चव्हाण यांचे आभार मानले.

# उत्तर मुंबईतील रखडलेले प्रकल्प ,रस्ते कामे मार्गी लागणार केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांची ग्वाही

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, म्हाडा आणि एमएम आरडीए च्या अधिकाऱ्यांसोबत बुधवारी झालेल्या संयुक्त बैठकीमध्ये उत्तर मुंबई आणि मुंबईतील रखडलेले विविध प्रकल्प कामे मार्गी लावण्यासंदर्भात तसेच वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असल्याची माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी बुधवारी दिली. भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड, आ. योगेश सागर, आ.मनीषा चौधरी, आ.सुनील राणे, भाजपा प्रदेश प्रवक्ता गणेश खणकर, ओमप्रकाश चौहान आदी उपस्थित होते.

श्री. गोयल यांनी सांगितले की,या बैठकीमध्ये कांदिवली येथे ३७ एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल उभारण्याबाबतचा प्रकल्प वेगाने मार्गी लावण्याचा निर्णय घेण्यात आला. गेल्या २०-२५ वर्षापासून रखडलेल्या या राष्ट्रीय क्रीडा प्राधिकरणाच्या प्रकल्पाचे काम मार्गी लावण्याचा मार्ग आजच्या बैठकीनंतर मोकळा झाला आहे. याठिकाणी भविष्यात आशियाई, राष्ट्रीय, राष्ट्रकुल आणि ऑलिम्पिक स्तरावरचे खेळाडू प्रशिक्षित केले जातील. या बैठकीत घेण्यात आलेल्या विविध निर्णयांमुळे मुंबईकरांचे जीवन सुखकर होणार आहे असेही श्री. गोयल यांनी नमूद केले.

श्री. गोयल यांनी सांगितले की उत्तर मुंबई आणि उर्वरित मुंबईमध्ये अर्धवट आणि रखडलेले विविध प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार मिळून युद्धस्तरावर काम करत आहे.बोरिवली येथील बाळासाहेब ठाकरे उद्यान आणि प्रमोद महाजन क्रीडा संकुल यांच्या सर्वांगीण विकासासाठी विस्तृत चर्चा करून त्याबाबत अहवाल लवकरच सादर करून तेथे क्रीडा सुविधा केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खेळाडूंच्या उज्वल भविष्यासाठी असे प्रकल्प महत्वाचे असून ते पूर्ण करण्यासाठी वेगाने कामे सुरू आहेत अशी माहिती श्री. गोयल यांनी दिली.

कांदिवली येथील कौशल्य विकास केंद्र येत्या दोन महिन्यांत आणि शिंपोली येथील कौशल्य विकास केंद्र येत्या ६-८ महिन्यांत सेवेत रुजू होईल अशी ग्वाही श्री. गोयल यांनी दिली.या बहुविद्याशाखीय केंद्रांमुळे पालघरपर्यंतच्या रहिवाशांना लाभ होणार आहे. मुबईकरांची वाहतुकीची समस्या सोडवून जीवन सुखकर करण्यासाठी देखील प्रयत्न सुरू असल्याचे श्री. गोयल यांनी सांगितले. आकुर्ली पश्चिम द्रुतगति मार्गावरील अंडरपासचे काम रखडले होते त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या होती. मात्र बैठकीमध्ये एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांनी ते काम येत्या १५ दिवसांत पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. वाहतूक समस्येवर तोडगा काढण्यासाठी टाटा कंपनीला वाहतूक व्यवस्थापन आराखडा बनवण्याची विनंती केली असल्याची माहिती श्री. गोयल यांनी दिली. सह पोलीस आयुक्तांशी चर्चा करून वाहतूक कोंडी होणाऱ्या ठिकाणी अतिरिक्त वाहतूक पोलीस तैनात करण्याची विनंती करून एक सर्वसमावेशक योजना तातडीने आखली जाणार आहे. प्रत्येकाला हक्काचे घर देण्याच्या दिशेने रखडलेल्या गृह आणि पुनर्विकास प्रकल्पांबाबतही बैठकीत चर्चा झाली. प्रत्येक प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ( एसआरए) नोडल एजन्सी म्हणून नियंत्रण ठेवून कामे पूर्ण करून घेणार असल्याची माहितीही श्री. गोयल यांनी दिली. पंतप्रधान मोदी यांच्या संकल्पनेतील 'एक पेड मां के नाम' या योजनेनुसार उत्तर मुंबईमध्ये मुंबई महानगर पालिकेतर्फे एक लाख वृक्षांची लागवड केली